कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ११.०३.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची विशेष/तातडीची सभा**

**सभा सुचना क्रमांक -६, दिनांक - ११.०३.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती..................................,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची विशेष /तातडीची सभा, **सोमवार, दिनांक -१५.०३.२०१०** रोजी, **दुपारी ३.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **सभा सुचना क्रमांक -६,दिनांक - ११.०३.२०१०** अन्वये खालील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात येत आहे.

कृपया सदर सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

**मा. अध्यक्ष महोदय, कळवा प्रभाग समिती यांचे आदेशान्वये.**

**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**विषय**

| | |
|---|---|
| १ | निर्मल अभियान तसेच सुलभ शौचलय अंतर्गत अर्धवट स्थितीत असलेली शौचालयांची कामे. |
| २ | ड्रेनेज व सिव्हरेजच्या अर्धवट स्थितीत असलेल्या कामांबाबत. |

**ठाणे महानगरपालिका मुख्यालयातील संबंधित विभागांच्या वरिष्ठ अधिका-यांनी सदर सभेस स्वत: उपस्थित रहावे अशी मा.अध्यक्ष व सर्व सन्मा.सदस्यांची मागणी आहे याची कृपया नोंद घ्यावी.**

कळवा प्रभाग समिती कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ११.०३.२०१०.

**मा. कळवा प्रभाग समितीची विशेष/तातडीची सभा**

**सभा सुचना क्रमांक -६, दिनांक - ११.०३.२०१०**

प्रति,
श्री/श्रीमती.................................,
सन्मा.सदस्य/सदस्या,
कळवा प्रभाग समिती,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या कळवा प्रभाग समितीची विशेष /तातडीची सभा, **सोमवार, दिनांक -१५.०३.२०१०** रोजी, **दुपारी ३.३०** वाजता यशवंत रामा साळवी, ऑलिम्पिक साईज तरण तलाव, कळवा प्रभाग समिती सभागृहात **सभा सुचना क्रमांक - ६,दिनांक - ११.०३.२०१०** अन्वये खालील विषयांवर विचारविनिमय करणेसाठी आयोजित करण्यात आली होती. सदर सभेचे इतिवृत्तांत पुढीलप्रमाणे :-

सदर सभेस खालीलप्रमाणे सन्मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. मनिषा महेश साळवी | - | मा. अध्यक्षा |
| २. | श्री. उमेश काशिनाथ पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ३. | श्री. मिलिंद भारत पाटील | - | सन्मा. सदस्य |
| ४. | श्रीमती.सुरेखा सुरेश खातू | - | सन्मा. सदस्या |
| ५. | श्री. दिनेश दाजी कांबळे | - | सन्मा. सदस्य |
| ६. | श्री. सुभाष आत्माराम खारकर | - | सन्मा. सदस्य |
| ७. | सौ. प्रमिला मुकूंद केणी | - | सन्मा. सदस्या |
| ८. | सौ. अपर्णा मिलिंद साळवी | - | सन्मा. सदस्या |
| ९. | श्री. प्रभाकर मोतीराम पवार | - | स्विकृत सदस्य |
| १०. | श्री. किशोर काशिनाथ भोईर | - | स्विकृत सदस्य |

सदर सभेस खालील प्रमाणे सन्मा. सदस्य अनुपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | श्री. मनोज विठ्ठल लासे | - | मा. उप-महापौर |
| १२. | श्री. राजेन्द्र रमेश साप्ते | - | सन्मा. सदस्य |
| १३. | श्री. अशोक नारायण भोईर | - | सन्मा. सदस्य |
| १४. | श्री. गणेश यशवंत साळवी | - | सन्मा. सदस्य |
| १५. | ॲड. सौ.अनिता सुनील गौरी | - | सन्मा. सदस्या |
| १६. | श्री. राजेश आत्माराम खारकर | - | सन्मा. सदस्य |
| १७. | श्री. सचिन जयराज म्हात्रे | - | सन्मा. सदस्य |
| १८. | श्री. हेंमंत आत्माराम खारकर | - | स्विकृत सदस्य |

## मा. प्रभाग अधिकारी विषयपत्रिका वाचून दाखवितात.

**श्रीमती. सुरेखा सु. खातू, सन्मा.सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, आपली दि.११.३.२०१० रोजी प्रभाग समितीची सभा झाली त्यामध्ये सांगितल्यानुसार निर्मल अभियान व ड्रेनेजचे अधिकारी कळवा प्रभाग समिती सभेस उपस्थित नव्हते त्यासाठी ही आजची विशेष सभा लावण्यांत आली. परंतू विशेष सभा लावून त्यांना त्यासाठी बोलावून आजही कोणतेही जबाबदार अधिकारी येथे उपस्थित नाहीत. आमचे जे प्रश्न आहेत त्याबाबत योग्य उत्तर देणारे, संपूर्ण माहिती देणारे अधिकारी उपस्थित नाहीत. तरी आम्ही आता सभेमध्ये कोणाला विचारायचे ? आम्हीच बोलायचे आणि आम्हीच एकायचे असा प्रसंग आहे. एकच पर्याय आपल्यापुढे आहे की, मा.आयुक्तांना या आधीही पत्र दिलेले आहे तसेच पुन्हा एक पत्र देऊन उपस्थित सन्मा.सदस्यांच्या त्यावर सहया घेऊन विशेष सभेस अधिकारी उपस्थित नसल्याबाबत आपला निषेध व्यक्त करु या. यापुढेही हीच परिस्थिती असेल तर पुढच्या सभाही तहकूबच करायला हवी. अधिका-यांची कातडी गेंडयाची झाली आहे. इथे एकात्मिक नालें संदर्भातील दोन अधिकारी उपस्थित आहेत तसेच ठेकेदार उपस्थित आहेत. माझ्या प्रभागातील एकात्मिक नाले संदर्भातील कामे अर्धवट आहेत ती पुन्हा चालू करतो असे आत्ताच मला सांगितले आहे. सिव्हरेजचे काम अत्यंत बेजबाबदारपणे होत आहे.

सिव्हरेज व निर्मल अभियानसंदर्भात प्रत्येक सभेमध्ये जबाबदार अधिकारी सांगूनही उपस्थित नसतात त्याबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. कोणाशी चर्चा करायची ? प्रशासन निर्ढावले आहे. तरी ही सभा निषेध व्यक्त करुन तहकूब करण्यांत यावी अशी मी सूचना करते.

**मा.अध्यक्षा :-**

या संदर्भात मा.आयुक्त यांचेकडे आजच्या विशेष सभेमध्येही निर्मल अभियान व सिव्हरेज संदर्भातील अधिकारी उपस्थित नसल्यामुळे निषेधाचे पत्र देऊन सभा तहकूब करु या.

**श्री.उमेश पाटील -सन्मा.सदस्य :-**

मा. अध्यक्ष महोदया, पावसाळा दोन महिन्यावर आलेला आहे आणि प्रत्येक प्रभागामध्ये सिव्हरेज व निर्मल अभियानची कामे अर्धवट स्थितीत आहेत. आज विरोधी पक्ष नेत्यांच्या दालनामध्येही अधिकारी आम्हांला उत्तरे देत होते ते ऐकून मी उदास झालो कारण उत्तराप्रमाणे प्रत्यक्षात काम काहीच नव्हते. माझ्या प्रभागात काम व्हावे ही प्रत्येक नगरसेवकाची भावना आहे. त्यासाठी आजची विशेष सभा लावण्यांत आली आहे परंतू विशेष सभेसही अधिकारी उपस्थित रहात नाहीत. वास्तविक या सभेस अधिकारी उपस्थित रहायला हवे होते परंतू या सभेस उपस्थित न राहून त्यांनी मा. अध्यक्षांचा व सन्मा. सदस्यांचा अपमान केला आहे. सन्मा.सदस्या खातू यांनी मांडलेल्या सूचनेस मी अनुमोदन देत आहे. अश्या अधिका-यांना याबाबत समज दिलीच पाहिजे अशी माझी स्वतःची भावना आहे. खरोखरच या अधिका-यांची गेंडयांची कातडी आहे. माझ्या प्रभागात २४ सिव्हरेज व १० शौचालयाची कामे आहेत त्यापैकी ४च सिट बांधलेले आहेत. वर्ष झाले कामे तशीच आहेत. एम.एम.आर.डी.ए.कडून कामे होत नाहीत तेव्हा ठाणे महानगरपालिकेकडून बांधून दया. तसा अहवाल नितीन पवार तुम्ही तयार करा व मा.आयुक्तांकडे पाठवून दया. सिव्हरेज संदर्भातील कामे बंद करा. कुठेही त्यांचेही काम व्यवस्थित होत नाही. तरी अधिका-यांच्या निषेधार्थ आजची सभा तहकूब करण्यांत यावी यास मी अनुमोदन देत आहे.

**सौ.अपर्णा साळवी -सन्मा. सदस्या :-**

मा. अध्यक्ष महोदया, विशेष सभा याचा अर्थ काय ? अशा पध्दतीचे पत्र मा.आयुक्तांकडे गेले पाहिजे. विशेष सभा म्हणजे प्रत्येकाने जबाबदारीने सभेस येणे आवश्यक आहे. आम्हांला कामे नाहीत का ? आम्ही रिकामटेकडे आहोत का ? मिटींग लावली की धावतपळतं यायचं परंतू संबंधित अधिकारी उपस्थित हवेत की नको ? अधिकारी विशेष सभा आहे याची नोंद त्यांच्या दैनंदिनीमध्ये (डायरीमध्ये) करीत नाहीत का ? जर सभेस येण्यास जमतं नसेल तर तसे संबंधित प्रभाग समितीस तसे कळविले पाहिजे की मला आज सभेत येण्यास जमणार नाही. सभा पुढे ढकलता आली असती. तरी माझे असे म्हणणे आहे की, महिला अध्यक्षा या नात्याने हा अध्यक्षांचा अपमान आहे तसेच सन्मा.सदस्यांचाही अपमान आहे. याबाबत निषेध व्यक्त करुन मा.आयुक्तांना विचारले पाहिजे की, यापुढे अधिकारी उपस्थित रहाणार नसतील तर सभा लावायच्या की नाही ? की प्रभाग समितीला महत्वच नाही ? आम्ही इथे बाहुले बसलो आहोत का ? सभेमध्ये विषय वाचायचे आणि त्यावर उत्तर दयायला अधिकारीच नाहीत ? सभांमधील चर्चेमधून काहीच निष्पन्न होत नाही मग सभा लावायच्या कशासाठी ?

आजच्या सभेत ठेकेदार उपस्थित आहेत म्हणून त्यांच्या कामाच्या दर्जाबाबत मी सांगते की, मध्यंतरी रेतीचा पुरवठा कमी होत होता त्यावेळी स्टोन पावडर वापरुन कसंबसं चेंबर्स बनवून ठेवलेले आहेत. काम करताना गाडयांच्या काचा फुटणे, पाईपलाईन फुटणे, केबल तुटणे अशा अनेक अडचणी निर्माण होतात. अशावेळी स्थानिक लोकप्रतिनीधी म्हणून आम्ही सहकार्य करतो मात्र त्यांच्याकडून काहीच सहकार्य मिळत नाही. आज महिनाभर फोन लावतोय परंतू ठेकेदार गायब. इतके मोठे काम महापालिकेने त्यांना दिले आहे तेव्हा जबाबदार अधिकारी तेथे नको का ? नागरिक आमच्याकडे गाडयांचा काचा फुटल्या की येतात त्यांना भरपाई कोण देणार ? आम्ही देणार का ? संबंधित ठेकेदाराने संबंधित नागरिकांशी चर्चा करावी. केंद्र शासन व राज्य शासनाकडून कोटयावधी रुपयांचा या प्रकल्पासाठी निधी मिळत आहे परंतू असे बेजबाबदारपणे काम होत असेल तर त्याचा गैरवापर होत आहे असा माझा आरोप आहे. जमिनीच्या आत ७ ते ८ फूट खोल आहे असे आपण म्हणतो परंतू असे तकलादू काम केले तर भविष्यात मोठी हानी झाल्याशिवाय रहाणार नाही कारण त्यामध्ये गॅसेस असतात आणि केमिकलमुळे फुटण्याची शक्यता असते. ठेकेदाराला वाटते या लोकांना काय कळतयं ! दरवेळी आम्ही म्हणतो की आपल्याकडे दक्षता विभाग असायला हवा. स्थानिक लेवलला फक्त त्यांना कामे दाखवायची आणि बाकीची कामे ठेकेदारांच्या पध्दतीने होऊ देत असे आहे का ? पावसाळा जवळ आला आहे तेव्हा जे टप्पे चालू आहेत ते ठराविक वेळेत पूर्ण होऊ देत. सगळीकडे खोदून काय उपयोग ?

कालच वर्तमानपत्रात बातमी आली होती की, सिव्हरेजच्या कामामध्ये दोन मजूरांचा गुदमरुन मृत्यू झाला. तेच जर नागरिकांच्या बाबतीत घडले असते तर खूप मोठा इश्यू झाला असता. तरी याबाबत काळजी घेतली पाहिजे. त्यांनी केलेले कव्हरींग व्यवस्थित नसते. मुले वाकून पहायला जातात, कुत्रे पडू शकतात अशावेळी काय करणार ? याबाबत दक्षता घेणे आवश्यक आहे. तरी संबंधित अधिका-यांविषयी मा.आयुक्तांकडे तक्रार गेली पाहिजे व असेच अधिकारी सभांमध्ये उपस्थित रहाणार नसतील तर सभा लावयची की नाही ? अशा पध्दतीने विचारणा झाली पाहिजे.

**मा. कळवा प्रभाग समिती ठराव क्रमांक - १९१,दिनांक १५.०३.२०१०**

**ठराव** :-

आज दि.१५.३.२०१० रोजी निर्मल अभियान व ड्रेनेज संदर्भातील विषयांवर चर्चा करण्यासाठी कळवा प्रभाग समितीची विशेष सभा आयोजित करण्यांत आली होती. परंतू सदर विशेष सभेस आजही सन्मा.सदस्यांच्या प्रश्नांना योग्य उत्तर देणारे जबाबदार संबंधित अधिकारी उपस्थित नव्हते. याबाबत सन्मा.सदस्यांनी नाराजी व्यक्त केली व मा.आयुक्तांना विशेष सभेस अधिकारी उपस्थित नसल्याबाबत पत्र देऊन,उपस्थित सन्मा.सदस्यांच्या त्यावर सहया घेऊन निषेध व्यक्त केला. महिला अध्यक्षा या नात्याने हा मा.अध्यक्षांचा अपमान आहे तसेच सन्मा.सदस्यांचाही अपमान आहे. मा.कळवा प्रभाग समितीच्या होणा-या सभांमध्येही अधिकारी उपस्थित नसतात. तरी यापुढे अधिकारी उपस्थित रहाणार नसतील तर सभा लावायच्या की नाही ?तसेच विशेष सभेचा अर्थ काय ? सभेचे अधिका-यांना गांर्भिय आहे का ? असे प्रश्न सन्मा.सदस्यांनी उपस्थित केले.

सदर विशेष सभेस संबंधित विषयाचे जबाबदार अधिकारी उपस्थित नसल्याबाबत मा.अध्यक्षा व सर्व सन्मा.सदस्य निषेध व्यक्त करुन आजची विशेष सभा तहकूब करीत आहोत असे ही समिती ठरवित आहे.

**सुचक -** श्रीमती. सुरेखा खातू **अनुमोदक -** श्री.उमेश पाटील

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- मनिषा म. साळवी,**
**अध्यक्षा,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाण**

:-:-:-:-:-:-:-:-:

(त्यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा तहकूब केल्याचे जाहिर केले.)

**सभा संपल्याची वेळ** :- संध्या. ४.१५ वाजता.
**दिनांक** :- १५.०३.२०१०
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सही/- मनिषा म. साळवी,**
**अध्यक्षा, कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

**सही/- प्रभावती भालेराव,**
**प्रभाग अधिकारी,**
**कळवा प्रभाग समिती,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**